# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक

सर्व प्रशासकीय अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ७३ व्या वर्धापनदिनानिमित्त शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सोमवार, दिनांक १४ फेब्रुवारी, २०२२ रोजी दुपारी ०२.३० ते ०६.०० वा.या वेळेत इनडोअर हॉल, विद्यापीठ क्रीडा कार्यालयाशेजारी संपन्न होत आहे.

तरी सर्व अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी ठीक दुपारी ०२.३० वाजता सदर विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमास उपस्थित रहावे.

कुलसचिव

गणेशखिंड , पुणे ४११००७
जावक क्र.आर/२/४९
दिनांकः ०८/०२/२०२२

**प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठीः**

१.सर्व संबंधित शैक्षणिक विभागप्रमुख }
२.सर्व संबंधित प्रशासकीय शाखाप्रमुख }
सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावे ही विनंती.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक

सर्व शिक्षक , शिक्षकेतर अधिकारी व सेवकांना कळविण्यात येते की,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ७३ वा वर्धापनदिन गुरूवार दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ रोजी संपन्न होत आहे. त्या प्रित्यर्थ शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवकांचे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

या परिपत्रकाव्दारे असेही कळविण्यात येते की, जे शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवक विविध गुणदर्शन कार्यक्रमामध्ये भाग घेऊ इच्छित आहेत अशा शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवकांनी आपल्या विभागप्रमुखांमार्फत तसा लेखी अर्ज बुधवार , दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२२ पर्यत श्रीमती मेघना माटे, शैक्षणिक विभाग व श्री. संतोष मदने, परीक्षा विभाग यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे. तसेच विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमाकरिता वेळेची मर्यादा असल्याने प्रथम येणा-यास प्राधान्य देण्यात येणार आहे व ऐन वेळेस येणा-या सादरीकरणाला सहभागी होता येणार नाही.

गुरूवार , दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ रोजी दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत सदर कार्यक्रमात भाग घेऊ इच्छिणा-या शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवकवर्ग हे सादर करणा-या विविध गुणदर्शनाचे कार्यक्रमाची निवड चाचणी होणार असून शनिवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०२२ रोजी दुपारी ४.०० ते ६.०० या वेळेत अंतिम रंगीत तालीम होणार आहे, याची नोंद घेण्यात यावी.

या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभागी होणा-या शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवकांना सदर कार्यक्रमात सहभाग घेतल्याबाबतचे विद्यापीठाचे प्रशस्तिपत्रक देण्यात येणार आहे, याची सर्वानी नोंद घ्यावी.

कुलसचिव

गणेशखिंड,पुणे ४११००७
जावक क्र. आर/२/४०
दिनांक : ०८ फेब्रुवारी , २०२२

प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठी:

१. सर्व संबंधित शैक्षणिक विभागप्रमुख }
२. सर्व संबंधित प्रशासकीय शाखाप्रमुख }

सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावे. ही विनंती.